# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १८/०७/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील गुप्ता इलेक्ट्रीक्स अॅन्ड मोबाईल कलेक्शन सावनेर येथे दिनांक २३/०७/२०२१ चे ११.०० वा. ते दि. १०/११/२०२१ चे १६.०० वा. दरम्यान आरोपी नामे– मोहम्मद इरफान बलसैन अहमद शेख रा. क्वॉर्टर नं. ८६१ वलनी खदान ता.सावनेर याने मोहम्मद सर्फराज मोहम्मद खलील रा. ब्लॉक नं १०० क्वार्टर क्र. ४, वार्ड क्र. ३ शक्तीनगर कॉलनी ता. सावनेर व मोहम्मद नाहिद अहमद रा. ब्लॉक नं १०० क्वार्टर नं. ४ वार्ड क्र. ३ शक्तीनगर डब्लुसिएल सावनेर या नावाने बनावटी आधार कार्ड व पॅन कार्ड तयार केले. त्यावर आरोपीने स्वताचे फोटोग्रॉफ लावले. त्याव्दारे युनियन बॅक शाखा सावनेर येथे खाते उघडुन स्वताच्या आर्थिक फायदयाकरीता गुप्ता इलेक्ट्रीक्स अॅन्ड मोबाईल कलेक्शन सावनेर या दुकानातुन दि. २३/०७/२०२१ रोजी हेअर कंपनीचे फ्रिज किमंत २६,९००/–रु. तसेच दि. १६/०९/२०२१ रोजी त्याच दुकानातुन शाओमी कंपनीची एल.ई.डी टिव्ही किमंत २२,०००/–रु. व दि. १०/११/२०२१ रोजी सॅमसंग कंपनीची एल.ई.डी टिव्ही किमंत ४०,०००/–रु. असे एकुण ८८,९००/–रु. चा मुददेमाल बजाज फायनन्स कंपनी कडुन हफ्ताने खरेदी केलेल्या सामानाचे संपुर्ण हफ्ते न भरता ९,९९४/–रु. ची बजाज फायनन्स कंपनीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेश गणेशराव मोहोकर वय ३२ वर्ष रा. २०३ हाउस नं. ६४३/१२६ गौराग अपार्टमेंट, सुभेदार ले आउट प्लायवुढ वर गजानन शाळा समोर बापेश्वर चौक अयोध्या नगर, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४१९,४२०,४६७,४६८,४७१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी निशांत फुलेकर मो.न ७५८८५६४३००हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा पंचधार शिवार येथे दिनांक १७/०७/२२ चे ००.०१ वा. ते ००.१५ वा. सुमारास वर्कर सुरेंद्र पुरणसिंग जाधव (मृतक), वय ५३ वर्ष, रा. कचारी सावंगा ता. काटोल हा बस मधुन उतरून काटोल कडे जाणारा रोड क्रॉस करीत असतांना कोंढाळी कडुन काटोल कडे जाणारी सोलार कंपनीमध्ये वर्कर ला नेणे आणने करणारी बस क्र. एमएच– ४०/एटी– ०५०९ चा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील बस ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पादचारी वर्कर सुरेंद्र पुरणसिंग जाधव याला समोरून धडक मारून अपघात करून बस सोडुन पळुन गेला. या अपघातामध्ये पादचारी वर्कर सुरेंद्र पुरणसिंग जाधव हा गंभीर जखमी होउन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आनंद देविदास तागडे वय ३५ वर्ष, रा. इंदीरानगर रिधोरा त. काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री राम ढगे मो नं ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. सावनेर:– दिनांक १७/०७/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय ३५ वर्ष हिला आरोपी नामे– मोनू हरिप्रसाद उवनारे वय ४० वर्ष रा. डब्लुसिएल वाघोडा ता. सावनेर हा ओळखत असुन त्याने फिर्यादीचा पाठलाग करुन रस्त्यामध्ये आडवून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने फिर्यादीला हातबक्कीने मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड), ३४१, ३२३, ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो.क्र. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा कोळब लोकशाही ढाबा येथे दिनांक १६/०७/२०२२ चे ०१.०० वा. ते १७/०७/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास **नितीन साहेबराव पारधी (मृतक), वय ३२ वर्ष, रा. थडीपवनी ता. नरखेड** याच्या दारूचे अती सेवनाने प्रकृती खराब झाली. तो काहीच हालचाल करीत नसल्याने त्याला ग्रामिण रूग्णालय काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नरेश गणपतराव राजुरकर वय ५२ वर्ष रा. पेठबुधवार काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि अविनाश बाहेकर मो न ९३७३७४०८१४ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा बोरगाव शिवार येथे दिनांक १६/०७/२०२२ चे २०.०० वा. सुमारास **१) नरेन्द्र विजय मोटघरे (मृतक), वय.५३ वर्ष रा.कुरखेडा जिल्हा.गडचिरोली व २) चंद्रप्रकाश गोवर्धन सोनवणे (मृतक), वय ३४ वर्ष रा.चिखली ता.तुमसर जि.भंडारा** हे मौजा बोरगाव शिवारातील नागपूर ते ईटारसी जाणाऱ्या रेल्वे पट्री कॉसिंग फाटक नं. २९० चे अंडर ब्रिजचे बांधकाम करीत असून मृतक क्रं. १) नरेन्द्र मोटघरे हा गावाला जाण्याकरीता बॅग घेवून रेल्वे मार्गाने बोरगावाकडे निघून गेला. काही वेळाने फिर्यादी यास रेल्वचे फाटक वरील चौकीदार यांनी फोनद्वारे माहिती दिली कि, वरील लेबर हा रेल्वेट्रॅकच्या मधोमध फिरत आहे. अशा माहिती वरून वरील लेबर चंद्रप्रकाश सोनवणे व ईतर दोन लेबर यांना नरेन्द्र मोटघरे यास आनणे कामी पाठविले व चंद्रप्रकाश सोनवणे हा नरेन्द्र मोटघरे याला घेवून रेल्वेट्रॅक वरून परत येत असता कळमेश्वर कडून नागपूर मार्गे जाणाऱ्या अज्ञात रेल्वेने धडक दिल्याने दोघेही जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शशीकांत महादेव अंबादे, वय ५४ वर्ष, रा. गोतम नगर वार्ड, पवनी ह. मु. श्रीराम हॉस्टेल बोरगाव खुर्द यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार मन्नान नौरंगाबादे मो नं. ९४२३६०४८२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**